

Janata Shikshan Sanstha's

# KISAN VEER MAHAVIDYALAYA, WAI

Library and Internal Quality Assurance Cell

in Collaboration with

Shivaji University College Librarians Association (SUCLA)

jointly organizes

## ONE DAY NATIONAL CONFERENCE on

# Emerging Technologies and Innovations in Libraries



**VOL.2**


**Chief Editor**

Principal, Dr.Gurunath Fagare

Dr. Pramod Tandale

**Executive Editor**

Dr. Shivaji P. Kamble



Aayushi International Interdisciplinary Research Journal

Peer Reviewed Journal | ISSN 2349-638x

Impact Factor 8.379 | website :www.aiirjournal.com


Scanned with OKEN Scanner

No part of this Special Issue shall be copied, reproduced or transmitted in any form or any means, such as Printed material, CD – DVD / Audio / Video Cassettes or Electronic / Mechanical, including photo, copying, recording or by any information storage and retrieval system, at any portal, website etc.; Without prior permission.

**Aayushi International Interdisciplinary Research Journal**

**ISSN 2349-638x**

Special Issue No.155

Feb.2026

**Disclaimer**

Research papers published in this Special Issue are the intellectual contribution done by the authors. Authors are solely responsible for their published work in this special Issue and the Editor of this special Issue are not responsible in any form.

## Editorial Board

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | डॉ. शिवाजी कांबळे | समन्वयक |
| २. | डॉ. शिवाजी ताटे | सहसमन्वयक |
| ३. | डॉ. बाळकृष्ण मागाडे | सदस्य |
| ४. | डॉ. भिमाशंकर बिराजदार | सदस्य |
| ५. | डॉ. संदीप वाटेगांवकर | सदस्य |
| ६. | श्रीमती. दिपाली चव्हाण | सदस्य |
| ७. | डॉ. अमोल कवडे | सदस्य |
| ८ | श्री. सोमनाथ सानप | सदस्य |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 68. | दिपाली निलेश रामुगडे,<br>श्री. ज्ञानेश्वर ईश्वर शिंगाडे | डिजिटल ग्रंथालयात ग्रंथपालांची बदलती भूमिका | 301 |
| 69. | श्री. विनोद विलास कांबळे ,<br>डॉ. शिवाजी पांडुरंग कांबळे | OPAC या सुविधेचा पश्चिम महाराष्ट्रातील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयांमध्ये वापर: एक विश्लेषणात्मक अभ्यास | 305 |
| 70. | गायत्री दिलीप चव्हाण,<br>अमोल थोरात | कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु. ग्रंथालयातील बेस्ट प्रॅक्टिस: एक अभ्यास | 309 |
| 71. | डॉ. विठ्ठल विश्वनाथ जाधव,<br>डॉ. शिवाजी पांडुरंग कांबळे | शैक्षणिक ग्रंथालयांतील स्मार्ट संदर्भ सेवांमध्ये चॅटबॉट्स व व्हर्च्युअल असिस्टंट्सची भूमिका | 315 |
| 72. | डॉ. अमोल सुभाष कवडे | ग्रंथालय : वाचन संस्कृतीचा रक्षक आणि विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक | 319 |
| 73. | जाधव विद्या सुधाकर ,<br>प्रा. श्री. शिंगाडे ज्ञानेश्वर | आजच्या उच्च शिक्षणात डिजिटल ग्रंथालय - काळाची गरज | 322 |
| 74. | काटकर नंदाराणी श्रीरंग | ग्रंथालयांमधील सायबर सुरक्षा आणि गोपनीयता: आव्हाने, धोके व उपाययोजना | 326 |
| 75. | श्रीमती मनीषा सचिन कुंभार,<br>डॉ. संजय क्षीरसागर | Big Data आणि ग्रंथालय व्यावसायिकांची भूमिका | 330 |
| 76. | डॉ.धनंजय जालिंदर निंबाळकर | वाचन संस्कृतीवृद्धीमध्ये ग्रंथालयाचे भूमिका: एक अभ्यास | 334 |
| 77. | श्रीमती नीता निलेश अडगळे,<br>श्री. ज्ञानेश्वर ईश्वर शिंगाडे | मोबाईल लायब्ररीज, ॲप्स आणि रिमोट ॲक्सेस सर्व्हिसेस: डिजिटल युगात माहितीच्या उपलब्धतेचे रूपांतर | 344 |
| 78. | श्री.पुरुषोत्तम बाबासाहेब वाकडे | महाविद्यालयीन ग्रंथालयांतील आधुनिक सेवा : संधी आणि आव्हाने | 347 |
| 79. | श्री. चव्हाण राहुल मारोतीराव | डिजिटल युगातील ग्रंथालय सेवांचे विपणन | 351 |





Scanned with OKEN Scanner

# ग्रंथालय : वाचन संस्कृतीचा रक्षक आणि विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक

**डॉ. अमोल सुभाष कवडे**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
किसन वीर महाविद्यालय, वाई

**प्रस्तावना :**

मानवी संस्कृतीचा इतिहास पाहिला तर वाचन आणि ज्ञानसंचय यांचा परस्परांशी अतूट संबंध दिसून येतो. सभ्यतेच्या विकासात ग्रंथालयांनी केवळ ज्ञानसाठा जपण्याचे काम केले नाही, तर समाजाला बौद्धिक दिशा देण्याची भूमिकाही पार पाडली आहे. ग्रंथालय म्हणजे केवळ पुस्तकांचा संग्रह नसून, ते विचारांची देवाणघेवाण घडवणारे, जिज्ञासेला चालना देणारे आणि व्यक्तिमत्त्व घडवणारे सजीव ज्ञानकेंद्र आहे. म्हणूनच ग्रंथालयाला वाचन संस्कृतीचा खरा रक्षक म्हटले तरी वावगे ठरणार नाही. आजच्या वेगवान आणि तंत्रज्ञानप्रधान युगात विद्यार्थ्यांच्या जीवनशैलीत मोठे बदल झाले आहेत. डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव, मोबाईल आणि सामाजिक माध्यमांचे आकर्षण, तत्काळ माहिती मिळवण्याची सवय यामुळे सखोल वाचनाची परंपरा काही प्रमाणात मागे पडताना दिसते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये चिंतनशील, विश्लेषणात्मक आणि सृजनशील विचारांची जडणघडण करण्यासाठी ग्रंथालयांचे महत्त्व अधिक वाढले आहे. ग्रंथालये विद्यार्थ्यांना केवळ माहिती देत नाहीत, तर योग्य संदर्भ, विश्वासार्ह स्रोत आणि सुसंगत ज्ञानाची दिशा देतात. त्यामुळे ती विद्यार्थ्यांची मार्गदर्शक संस्था ठरतात. ग्रंथालय हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे, बौद्धिक विस्ताराचे आणि मूल्याधिष्ठित व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र आहे. नियमित वाचनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, समजूतदारपणा, सर्जनशीलता आणि सामाजिक जाणीव निर्माण होते. ग्रंथालये विविध प्रकारचे साहित्य, संदर्भग्रंथ, नियतकालिके आणि डिजिटल साधने उपलब्ध करून देऊन विद्यार्थ्यांच्या ज्ञानप्रक्रियेला गती देतात. त्यामुळे वाचन संस्कृतीच्या संवर्धनात आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे.

**वाचन संस्कृतीचा ऱ्हास : आधुनिक आव्हाने**

आजच्या विद्यार्थ्यांसमोर वाचनाच्या संदर्भात अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. स्मार्टफोन, सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स आणि शॉर्ट व्हिडिओ यांच्या युगात विद्यार्थ्यांचे लक्ष खंडित झाले आहे. त्यांची एकाग्रता कमी होत चालली आहे आणि सखोल वाचनाची सवय नष्ट होत आहे. अनेक अभ्यासकांच्या संशोधनाने दाखवून दिले आहे की, सध्याच्या पिढीतील विद्यार्थी तासनतास सोशल मीडियावर वेळ घालवतात, परंतु एक पुस्तक पूर्ण वाचण्यासाठी वेळ काढू शकत नाहीत. याचे कारण केवळ तंत्रज्ञानाचे आकर्षण नाही. शैक्षणिक पद्धतीतील बदल, परीक्षाकेंद्रित शिक्षण, वाढत्या स्पर्धेचा दबाव आणि अभ्यासक्रमाचा ओझा यामुळे विद्यार्थ्यांना स्वैर वाचनासाठी वेळच मिळत नाही. पालक आणि शिक्षक देखील अनेकदा वाचनाला 'वेळेचा अपव्यय' समजतात आणि परीक्षेतील गुणांवरच भर देतात. या सर्व घटकांमुळे वाचन संस्कृती हळूहळू लुप्त होत चालली आहे. वाचन संस्कृती पुढे घेऊन जाण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी

**ग्रंथालयाची बहुआयामी भूमिका :**

ग्रंथालय हे केवळ पुस्तके उधार देणारी संस्था नाही, तर ते विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र आहे. अशा परिस्थितीत वाचन संस्कृती पुढे घेऊन जाण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रंथालयाची भूमिका फार महत्त्वाची ठरते.

१. **ज्ञानाचा खजिना आणि माहितीचे केंद्र** - ग्रंथालयात विविध विषयांवरील पुस्तके, नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध आणि इतर साहित्य उपलब्ध असते. आज इंटरनेटवर माहिती भरपूर आहे, पण ती सर्व विश्वासार्ह आहे याची खात्री कोणीच देत नाही. उलट ग्रंथालयातील साहित्य तज्ञांनी निवडलेले, प्रामाणिक आणि विश्वासार्ह असते. शैक्षणिक संशोधनासाठी, प्रकल्प कार्यासाठी आणि सखोल अध्ययनासाठी प्राथमिक स्रोत म्हणून ग्रंथालय अत्यंत उपयुक्त ठरते. आधुनिक ग्रंथालये



Scanned with OKEN Scanner

डिजिटल संसाधनांचा समावेश करून स्वतःला अद्ययावत ठेवत आहेत शिवाय ई-पुस्तके, ऑनलाइन डेटाबेस, शैक्षणिक जर्नल्स, ऑडिओबुक्स आणि kindal बुक याप्रकारच्या साहित्यामुळे ग्रंथालयांची उपयुक्तता वाढली आहे. विद्यार्थी आपल्या आवडीनुसार आणि गरजेनुसार विविध स्वरूपातील ज्ञान मिळवू शकतात.

**२.वाचन संस्कृतीचे संवर्धन :** ग्रंथालय हे वाचन संस्कृतीचे पालनापोषण करणारे ठिकाण आहे. विविध प्रकारच्या पुस्तकांच्या उपलब्धतेमुळे विद्यार्थ्यांना विविध लेखकांशी, विचारांशी आणि संस्कृतींशी परिचय होतो. साहित्य, विज्ञान, इतिहास, तत्त्वज्ञान, कला इत्यादी विविध क्षेत्रांतील पुस्तके वाचून विद्यार्थ्यांचे दृष्टिकोन विस्तृत होते. ग्रंथालयाचे वातावरण वाचनास अनुकूल असते. शांत, स्वच्छ आणि व्यवस्थित वातावरणात बसून वाचन करणे हा एक वेगळाच अनुभव आहे. घरात किंवा वसतिगृहात अनेक व्यत्यय येतात, परंतु ग्रंथालयात विद्यार्थी एकाग्रतेने वाचू शकतात. पुस्तकांच्या शेल्फमध्ये फिरताना अनेकदा अनपेक्षित पुस्तके आढळतात जी नवीन आवडींना जन्म देतात.

**३. सामाजिक समता आणि समान संधी :** ग्रंथालयाची सर्वात महत्त्वाची भूमिका म्हणजे सामाजिक समतेला चालना देणे. सर्व विद्यार्थ्यांना महागडी पुस्तके खरेदी करणे शक्य नसते. आर्थिकदृष्ट्या कमकुवत घरातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय हे ज्ञानप्राप्तीचे सर्वात सोपे आणि मोफत माध्यम आहे. ग्रंथालयात प्रत्येकाला समान संधी मिळतात, त्याही कोणत्याही भेदभावाशिवाय. सार्वजनिक ग्रंथालये आणि महाविद्यालयीन ग्रंथालये हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी तर ग्रंथालय हा बाह्य जगाशी जोडणारा पूल आहे. ग्रंथालयांमुळे ज्ञानाचे लोकशाहीकरण होते आणि समाजातील असमानता कमी होण्यास मदत मिळते.

**४.अभ्यासाचे आदर्श वातावरण :** ग्रंथालय हे केवळ वाचनासाठीच नाही तर अभ्यासासाठी देखील आदर्श ठिकाण आहे. अनेक विद्यार्थ्यांना घरी अभ्यासास अनुकूल वातावरण मिळत नाही. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील शांततेची गरज असते. ग्रंथालयात वाचन कक्ष, संदर्भ विभाग आणि समूह अभ्यासाच्या सुविधा उपलब्ध असतात. परीक्षेच्या दिवसांत ग्रंथालय विद्यार्थ्यांचे दुसरे घर बनते. दीर्घ वेळ एकाग्रतेने अभ्यास करणे, संदर्भ ग्रंथ वापरणे आणि चर्चा करणे यासाठी ग्रंथालयापेक्षा चांगले ठिकाण नाही. अनेक यशस्वी विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशाचे श्रेय ग्रंथालयाला दिले आहे.

**५.सांस्कृतिक आणि बौद्धिक विकास :** ग्रंथालय हे केवळ शैक्षणिक विकासासाठीच नाही तर सांस्कृतिक आणि बौद्धिक विकासासाठी देखील महत्त्वाचे आहे. साहित्यिक कार्यक्रम, पुस्तक प्रदर्शने, लेखक भेटी, कविताचाचन, चर्चासत्रे आणि कार्यशाळा या सर्वांचे आयोजन ग्रंथालयांमध्ये होते. यामुळे विद्यार्थ्यांना समाजातील विचारवंत व्यक्तींशी संवाद साधण्याची संधी मिळते. वाचन क्लब, वादविवाद स्पर्धा, लेखन स्पर्धा इत्यादी उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होते. ग्रंथालय हे सामाजिक संवादाचे केंद्र बनते जिथे समविचारी लोक एकत्र येतात, विचारांची देवाणघेवाण होते.

**६.संशोधन आणि नवोन्मेषाचे केंद्र :** उच्च शिक्षणात संशोधनाचे महत्त्व अधिक आहे. ग्रंथालय हे संशोधकांसाठी प्रयोगशाळा आहे. शोधनिबंध, संशोधन ग्रंथ, जर्नल्स, डेटाबेस आणि संदर्भ साहित्य यांच्या उपलब्धतेमुळे संशोधनकार्य सुलभ होते. विद्यापीठीय ग्रंथालयांमध्ये विशेष संशोधन विभाग असतात जिथे पीएचडी आणि पदव्युत्तर विद्यार्थी आपले संशोधन करतात. डिजिटल ग्रंथालयांमुळे दुर्मिळ आणि ऐतिहासिक साहित्य देखील उपलब्ध होऊ लागले आहे. जुनी हस्तलिखिते, दुर्मिळ पुस्तके, ऐतिहासिक दस्तऐवज यांचे डिजिटलीकरण करून त्यांचे जतन केले जात आहे आणि संशोधकांना उपलब्ध करून दिले जात आहे.

**७. तंत्रज्ञान आणि माहिती साक्षरता :** आधुनिक ग्रंथालये विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान साक्षरता प्रदान करतात. संगणक, इंटरनेट सुविधा, ई-संसाधने, ऑनलाइन कॅटलॉग यांचा परिचय विद्यार्थ्यांना ग्रंथालयांमध्ये होतो. ग्रंथपाल विद्यार्थ्यांना माहिती कशी शोधायची, कोणते स्त्रोत विश्वासार्ह आहेत, संदर्भ कसे द्यावेत हे शिकवतात. माहिती साक्षरता हे २१ व्या शतकातील सर्वात महत्त्वाचे कौशल्य आहे. फेक न्यूज आणि चुकीच्या माहितीच्या युगात विद्यार्थ्यांना प्रामाणिक माहिती ओळखणे आवश्यक आहे. ग्रंथालय या कौशल्याचा विकास करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

**आजच्या विद्यार्थ्यांच्या गरजा आणि ग्रंथालयाचा प्रतिसाद :** आजचे विद्यार्थी डिजिटल नेटिव्ह आहेत. त्यांच्या शिकण्याच्या पद्धती, माहितीच्या अपेक्षा आणि अभ्यासाचे दृष्टिकोन बदलले आहेत. ग्रंथालयांनी या बदलांना प्रतिसाद देत त्यांच्या कार्यपद्धतीत आणि संसाधनांत बदल केलेला दिसून येतो.



Scanned with OKEN Scanner

१. **डिजिटल ग्रंथालये:** अनेक ग्रंथालयांनी डिजिटल संसाधने वाढवली आहेत. ई-पुस्तके, ऑडिओबुक्स, ऑनलाइन डेटाबेस, वेबिनार्स आणि व्हर्च्युअल टूर्स उपलब्ध केल्या आहेत. विद्यार्थी घरबसल्या ग्रंथालयाच्या संसाधनांचा वापर करू शकतात.

२. **सहयोगी शिक्षणाच्या जागा:** आधुनिक ग्रंथालयांमध्ये समूह अभ्यासाच्या कक्ष, चर्चा कक्ष आणि सहयोगी प्रकल्पांसाठी जागा उपलब्ध करून दिल्या आहेत. विद्यार्थी एकत्र येऊन चर्चा करू शकतात, प्रकल्प तयार करू शकतात आणि एकमेकांना मदत करू शकतात.

३. **व्यक्तिगत मार्गदर्शन:** आधुनिक ग्रंथपाल केवळ पुस्तके उपलब्ध करून देणारे कर्मचारी नाहीत तर, ते मार्गदर्शक आणि शिक्षकदेखील आहेत. ते विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करतात, संशोधनात मदत करतात आणि योग्य संसाधने शोधण्यात साहाय्य करताना दिसतात.

**ग्रंथालयासमोरील आव्हाने :**

आपल्याला ग्रंथालयांच्या उपयुक्ततेची जाणीव असली तरी आज ग्रंथालये अनेक अडचणींचा सामना करताना दिसतात, त्यांच्यासमोर अनेक आव्हाने आहेत.

१. **आर्थिक मर्यादा :** अनेक ग्रंथालयांना पुरेसा निधी मिळत नाही. नवीन पुस्तके खरेदी करणे, डिजिटल संसाधने मिळवणे आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे यासाठी भरपूर निधी आवश्यक असतो.

२. **तंत्रज्ञानाची धावपळ :** तंत्रज्ञान सतत बदलत आहे आणि ग्रंथालयांना त्याच्याशी जुळवून घेणे आवश्यक आहे. यासाठी सतत गुंतवणूक आणि प्रशिक्षण कार्यशाळा होणे आवश्यक आहे.

३. **वाचनाची घटती सवय :** डिजिटल माध्यमांच्या आकर्षणामुळे वाचनाची सवय कमी होत आहे. तरुण पिढीला ग्रंथालयेकडे आकर्षित करणे हे मोठे आव्हान ग्रंथालायासमोर आव्हान आहे.

**समारोप :**

ग्रंथालय हे केवळ भूतकाळाचे अवशेष नाही तर भविष्याचे केंद्र आहे. वाचन संस्कृतीचे संवर्धन आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यात ग्रंथालयाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. डिजिटल युगाने ग्रंथालयांची उपयुक्तता कमी केली नाही तर त्यांना नवीन संधी दिल्या आहेत. आजच्या विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्य आणि मूल्ये या तिहेरी गुणांची आवश्यकता आहे. ग्रंथालय या तिन्ही गोष्टी प्रदान करू शकते. वाचनामुळे विचार विस्तृत होतात, कल्पनाशक्ती वाढते, भाषाकौशल्य सुधारते आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. ग्रंथालय हे या सर्व गोष्टींचे केंद्रबिंदू आहे. समाजाने ग्रंथालयांना फक्त पुस्तकांचे भांडार म्हणून नाही तर ज्ञानाचे मंदिर, संस्कृतीचे केंद्र आणि सामाजिक बदलाचे माध्यम म्हणून पाहणे आवश्यक आहे. सरकार, शैक्षणिक संस्था, समाज आणि व्यक्तींनी मिळून ग्रंथालयांना बळकट करणे आणि वाचन संस्कृती पुनरुज्जीवित करणे हे काळाची गरज आहे. शेवटी, एक सुप्रसिद्ध म्हण आहे - "ज्या घरात पुस्तक नाही तो देह आत्मा विरहित" - तसेच ज्या समाजात ग्रंथालय नाही तो समाज ज्ञान आणि संस्कृती विरहित असतो. ग्रंथालय जपले तर विद्यार्थी आणि वाचन संस्कृती दोन्ही समृद्ध होतील, आणि त्यातूनच एक प्रगत, ज्ञानी आणि संवेदनशील समाजाची निर्मिती होईल.

**संदर्भ :**

१. पाटील, र. दि. माहिती साक्षरता आणि ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन २०१९.
२.. काळे, सु.प्र. "डिजिटल युगात ग्रंथालयांची बदलती भूमिका"( शोधनिबंध), ग्रंथालय विज्ञान संशोधन, खंड १५, अंक २,
३. मोरे, प्र.ग. "ग्रामीण ग्रंथालयांचे महत्त्व आणि आव्हाने"( शोधनिबंध), सामाजिक संशोधन त्रैमासिक, खंड २५, अंक ४,
४. पांडे, वि. "वाचन संस्कृतीचे संकट", लोकसत्ता, १५ ऑक्टोबर २०२४,
५. वाघमारे, सं. "डिजिटल ग्रंथालयांचा वाढता वापर", महाराष्ट्र टाइम्स, ५ जानेवारी २०२५



Scanned with OKEN Scanner